# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. २५/०४/२०१७.

**प्रेस नोट**

## गुन्हे शाखेने केले हद्दपार असलेल्या आरोपीस जेरबंद.

दि.२५/०४/२०१८- गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक योगेश धोंडे हे पथकासह काल दि.२४/०४/२०१८ रोजी आयुक्तालय हद्दीत रेकॉर्डवरील आरोपीचा शोध घेत पेट्रोलिंग करीत असतांना हद्दपार इसम नामे अक्षय उर्फ भैया रमेश वाहूळ, वय १९ वर्ष, रा.एकता कॉलनी, सातारा परिसर, औरंगाबाद हा रेल्वेस्टेशन पार्किंग मध्ये दिसून आल्याने गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास मोठ्या शिताफीने जागीच पकडले. त्याच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार प्रतिबंधक कारवाई म्हणून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, औरंगाबाद शहर यांचे आदेशान्वये एक वर्षा करिता औरंगाबाद शहर व औरंगाबाद जिल्हयातून हद्दपार केले असताना नमूद आरोपी हा कोणतीही पूर्वपरवानगी न घेता औरंगाबाद शहरात वावरताना आढळून आला. यावरून त्याविरुद्ध पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस पुढील कार्यवाहीकामी पोलीस स्टेशन उस्मानपुरा यांच्या ताब्यात दिले.

हि कामगिरी सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामेश्वर थोरात, सपोनि.गुन्हे शाखा श्री.घनश्याम सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक योगेश धोंडे, पोहेकॉ/रामदास गायकवाड, संतोष सोनवणे, पोकॉ/ रितेश जाधव, आनंद वाहूळ यांनी केली.

SD/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर